

**- डॉ. किशोर पाठक -**

दुर्गा भागवत या आपल्या लेखनातून निसर्ग जीवनाचे वर्णन करतात. असे असले तरी, सृष्टीच्या निसर्ग चक्रानूसार बदलत जाणाऱ्या घटनांचे वर्णन त्या करतात. त्यांच्याकडे ललित लेखनासाठी असणारी संवेदनशीलता, निरीक्षण क्षमता, चिंतनशीलता, काव्यात्मकता यांचा सुरेख संगम आहे. त्यामुळे त्यांचे ललित गद्य लेखन वेगळे ठरते. एकंदरीत त्यांच्या सर्व लेखन कार्यावरून असे जाणवते की, मराठी ललित गद्य लेखनात दुर्गा भागवत यांनी आपल्या स्वतःचे वेगळेपण सिद्ध केले आहे. दुर्गा भागवत यांनी विपुल प्रमाणात लेखन केले असले तरी, दुर्गा भागवत म्हणजे गद्य लेखन व ललित गद्य लेखन म्हणजे दुर्गा भागवत असे म्हटले तर चुकीचे ठरणार नाही. त्यांच्या ललित गद्यात समाविष्ट होणाऱ्या 'ऋतुचक्र', 'भावमुद्रा', 'व्यासपर्व', 'रूपरंग' व 'पैस' या पुस्तकातून घडणारे जीवनदर्शन यात शोधले आहे.

◆◆◆

आता ई-बुक स्वरूपातही अथर्वची सर्व पुस्तके उपलब्ध...

- pejbook.com
- amazon.com
- Google Play Books
- atharvapublications.com

अथर्व पब्लिकेशन्स
ऑनलाईन पुस्तक खरेदीकरिता...
www.atharvapublications.com

दुर्गा भागवत यांच्या ललित लेखनातील जीवनदर्शन... - डॉ. किशोर पाठक

अथर्व पब्लिकेशन्स



# दुर्गा भागवत यांच्या ललित लेखनातील जीवनदर्शन...

**- डॉ. किशोर पाठक**



डॉ. किशोर पाठक

[illegible] 'लघुनिबंध', 'प्रवासलेख', 'व्यक्तिचित्रे, [illegible] यांचा समावेश ललित गद्यात होतो. 'ललितरंग आकलन व आस्वाद' या पुस्तकात 'ललितरंग' या पुस्तकातील लेखांचा आढावा घेतला आहे. स्त्री विषयक ललित गद्य हे या पुस्तकाचे वैशिष्ट्य आहे. या पुस्तकात आलेल्या लेखातून स्त्री व पुरुष या दोघांचा स्त्री विषयक दृष्टीकोन वर्णन केला आहे. यात 'मी' अनुभवाचे स्वरूप सांगितले आहे. 'मी' ने जे अनुभवले त्याचे वास्तव वर्णन यात केले आहे. प्रस्तुत लेखनातून भावनात्मक व चिंतनशील अशी वर्णने आली आहेत. तसेच राबणारी, कष्ट करणारी, घर-संसार सांभाळणारी अशा वेगवेगळ्या स्वरूपात स्त्री चे दर्शन घडवले आहे. भाषा व शैली विशेष हे या पुस्तकाचे वेगळेपण आहे.

Prashant
मराठी ₹ 135
ISBN 978-93-91391-01-0
9 789391 391010
www.prashantpublications.com
prasha[illegible]blication.jal@gmail.com
Also Available in e-Book kopykitab.com

ललितरंग आकलन व आस्वाद
डॉ. किशोर पाठक
प्रशांत पब्लिकेशन्स


Book

# ललितरंग

## आकलन व आस्वाद

KCP
2021-22

डॉ. किशोर पाठक



Prashant

Scanned with OKEN Scanner

# स्त्रीवाद

## (स्वरुप आणि प्रासंगिकता)

Book
2021-22




संपादक

**डॉ. संदीप बी. काळे**

Scanned with OKEN Scanner

**स्त्रीवाद** ( स्वरुप आणि प्रासंगिकता )

■ डॉ. संदीप बी. काळे

■ प्रथम आवृत्ती – दि. ०८ मार्च २०२२

© प्रकाशक व संपादक

■ प्रकाशक

आधार पब्लिकेशन, अमरावती.

हनुमान मंदिराजवळ, पाठ्यपुस्तक मंडळा समोर,

वि.म.वि.कॉलेज मागे, अमरावती

मो. ९५९५५६०२७८

email- aadharpublication@gmail.com

■ मुखपृष्ठ संकल्पना

विलास पवार

सरिता ग्राफिक्स, अमरावती

■ अक्षरजुळवणी

सरिता ग्राफिक्स,

कठोरा रोड, अमरावती

■ Price : 400/-

**ISBN-** 978-93-91305-97-0

सुचना:- सदर अंकामध्ये प्रकाशित झालेल्या लेखास, संपादक, प्रकाशक, मालक, मुद्रक जबाबदार राहणार नाही. या अंकामध्ये प्रकाशित झालेले लेख लेखकाचे त्यांचे वैयक्तिक मत आहे.

Scanned with OKEN Scanner

# स्त्रीवाद आणि महिला सबलीकरण

प्रा. अरुण डी. मोरे
मराठी विभाग पंकज कला व विज्ञान महाविद्यालय, चोपडा जि. जळगाव

स्त्रीवादाच्या संदर्भात विचार करत असतांना स्त्रीवादाची मूळ कल्पना पाश्चात्य आहे. स्वाभाविकपणे यासंदर्भात विस्तृत आणि व्यापक अशी मांडणी इंग्रजी साहित्य चर्चेच्या अनुषंगाने पाहता येते. मराठीतील स्त्रीवाद हा इंग्रजीमध्ये Feminism (फेमिनिझम) या नावाने ओळखतात. प्रसिद्ध लेखिका सीमान द बोव्हा यांनी स्त्रीवाद म्हणजे केवळ स्त्रीहक्काचे समर्थन नव्हे तर स्त्रीची 'स्त्री 'अशी ओळख करून देणे असे आहे. कारण प्राचीन काळापासून स्त्रियांना कुटुंब संस्थेत स्थान नव्हते. तिच्या मतांना विचारात घेतले जात नव्हते. तिचा स्वतःच्या शरीरावर ही हक्क किंवा अधिकार नव्हता .स्त्री ही पूर्णपणे असहाय्य दुर्बल आणि परावलंबी बनलेल्या स्त्रियांना राजकीय ,सामाजिक ,शैक्षणिक क्षेत्रातील समानता मिळवण्यासाठी दीर्घकाळ संघर्ष करावा लागत आहे. या संघर्षाचे दुसरे नाव स्त्रीवाद असे म्हटल्यास वावगे ठरू नये.

स्त्री जाणिवांचे स्वरूप स्त्रीशी निगडित आहे. अर्थात आजच्या काळात पुरुषही स्त्रियांच्या संदर्भात तशी जाणीव वागवितात पण प्रत्यक्ष अनुभव घेतांना मात्र पुरुष कमी पडतो. स्त्री अनुभवाची जाणीव मात्र स्त्रीलाच होते. यासंदर्भातील पहिली अवस्था म्हणजे स्त्री आणि पुरुष यांच्या मध्ये विषमता आहे. याची जाणीव व्हावयास हवी पुरुषाने निर्माण केलेली विषमता नाकारून स्पष्टपणे निषेध नोंदविणे एक व्यक्ती म्हणून स्वतःचा शोध घेत स्त्रीत्वाचा शोध घेणे ही अंतिम अवस्था आहे.स्त्री -पुरुष समान पातळीवर असल्याची जाणीव निर्माण होते. या सर्व प्रक्रियेतून विषमता विरहित नव समाजाची निर्मिती करणे हेच स्त्रीवादाचे उद्दिष्ट आहे.

स्त्री ही कधीही जन्माला येत नाही तर स्त्रीकडूनच स्त्री घडविली जाते. म्हणजे स्त्रीकडे एक व्यक्ती म्हणून पाहण्यापेक्षा तिच्याकडे बाई म्हणून पाहिले जाते बहुसंख्य माता आपल्या मुला-मुलींमध्ये भेद करतात. त्यांना वंशाचा दिवा म्हणून मुलगा हवा असतो. त्या जाणीवपूर्वक आपल्या मुलीला आदर्श गृहिणी होण्याचे पाठ



Scanned with OKEN Scanner

पडवत असतात.स्त्री हा स्त्रीवादाचा केंद्रबिंदू आहे.स्त्री आणि पुरुष यांच्या समाजात ज्या प्रतिमा रुढ आहेत. त्या जन्मसिद्ध नाहीत. तर त्या समाजानेच घडविल्या आहेत. असे स्त्रीवाद मानतो. स्त्रीच्या अशा घडविण्याला स्त्री वादाचा विरोध आहे. स्त्री आणि पुरुष यांच्यातला नैसर्गिक भेदानाच स्त्रीवाद मान्य करतो. आजची समाजव्यवस्था पुरुषप्रधान आहे. आणि स्त्रीवादाचा या पुरुषप्रधानतेला प्रखर विरोध आहे.'स्त्रीवाद 'म्हणजे स्त्रीला आपल्या स्वत्वाची जाणीव होणे होय. तिला आपल्या व्यक्तिमत्त्वाचा अर्थ कळणे, तिला अस्मितेचा सार्थ अभिमान वाटणे, तिच्या माणूसपणाबद्दल आत्मियता वाटणे होय.स्त्रीला तिचे हक्क-अधिकार कळणे आणि तिच्या अवमूल्यनाची शोषणाची जाणीव होणे या सर्वांप्रती तिने संघर्ष करणे म्हणजे स्त्रीवाद होय .स्त्रीला तिच्या गुलामीची जाणीव होणे आणि तिने आपल्या गुलामी विरुद्ध बंड करणे हयालाच स्त्रीवाद असे म्हणतात.

२१व्या शतकात महिला सबलीकरणाचा प्रश्न निर्माण होतो. कारण आज सुद्धा भारतात महिलांना पुरुषांच्या बरोबरीने स्थान दिले जात नाही.स्त्री सबलीकरण म्हणजे काय? हे सांगताना असे म्हणता येईल की, स्त्री पुरुषांत असे संबंध प्रस्थापित करणे की ज्यामध्ये दोघेही एकमेकांना साथ देतील. आणि अप्रत्यक्षपणे स्वतःबरोबर कुटुंब व समाजाला सशक्त बनवतील यामध्ये प्रामुख्याने प्रत्येकानेच स्वतःच्या हक्का बरोबर इतरांच्या अधिकाराची जाणीव ठेवणे अभिप्रेत आहे. प्रत्येकाने स्त्रियांची मानसिक ताकद वाढविणे त्यांना सक्षम बनविणे हा महत्त्वाचा पैलू आहे. यामध्ये स्त्रियांत चिकाटी ,जिद्द, बदलाची क्षमता ,धैर्य निर्माण करून छळ व अन्यायाला विरोध करणे म्हणजे महिला सबलीकरण होय.

परिस्थितीवर मात करून स्वतः बदलणे व इतरांना विचार बदलायला प्रवृत्त करणे न्यायाची बाजू व अन्यायाची चीड निर्माण करणे म्हणजे महिला सबलीकरण होय. १९९० मध्ये National Commission for Women स्थापन झाले. स्त्रियांबरोबर पुरुषांनाही समतेचे तत्व पाळले पाहिजे असे त्यात नमूद केले आहे. परंतु अनेक शतकापासून स्त्रीला हिन लेखले जाते. जन्म, खेळ ,हसणे ,बोलणे ,चालणे इत्यादींवर मर्यादा घातल्या जातात. शिक्षणात फरक केला जातो. कुटुंबात स्त्रीला



Scanned with OKEN Scanner

आणि मुलींनाच जखडून ठेवले जाते.स्त्री सबलीकरणाची खरी गरज आज आहे. अलीकडे मुलांना शिकलेली मुलगी बायको म्हणून हवी असते. परंतु कुटुंबाची सत्ता मात्र ते स्वतःकडे ठेवतात. वंश , संपत्ती यांची मालकी पुरुष स्वतः कडे ठेवतात. याचा अर्थ स्त्रियांचा कुटुंबातच दर्जा दुय्यम आहे. महिलांचे आरोग्य खालावले आहे. महिला दुहेरी कामे करतात. त्यांना कायद्याचे ज्ञान नाही. स्वतःच्या ताकदीची जाणीवही नाही. कुटुंबातच स्त्रीला समान दर्जा नाही.अनेक अधिकार स्त्रियांना नाकारले जातात. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारत स्त्रियांच्या सशक्तीकरणासाठी प्रयत्न करीत आहे. शासन आणि शासनेत्तर क्षेत्र अश्या दोन्ही क्षेत्रांद्वारे स्त्री शिक्षणाला महत्त्व दिले आहे. त्यांना उत्तम आरोग्य मिळावं .उपजीविकेचे साधन मिळावे. घरगुती व सामाजिक निर्णय प्रक्रियेत सहभाग घेता यावा यासाठी संधी देत आहेत. परिपूर्ण जीवन जगता यावे यासाठी १९९३ मध्ये झालेली घटना दुरुस्ती या दृष्टीने मोठे पाऊल म्हणता येईल.या दुरुस्तीमुळे अनुसूचित जनतेला ग्रामपंचायत क्षेत्रातील लोकसंख्येनुसार ग्रामपंचायतीमध्ये जागांना आरक्षण मिळू लागले. महिलांसाठी एक-तृतीयांश राखीव जागा ही फलदायी ठरल्या .त्यामुळे महिला राजकीय क्षेत्रात व सामाजिक क्षेत्रात सक्षम झाल्या म्हणून अर्थसंकल्पाने महिलांना सबळ बनविण्यासाठी विविध योजनांची निर्मिती केले आहे. अर्थसंकल्प महिला प्रधान असल्याने महिला लाभधारकांना विशेष फायदा मिळाला. शासनाच्या पुढाकाराने दोन समस्या सोडविल्या पहिली समस्या म्हणजे स्त्रियांचे आरोग्य व ग्रामीण भागात राहणाऱ्या स्त्रियांचे इंधन स्वयंपाक बनविण्यासाठी लागणाऱ्या पारंपारिक सवयींपासून मुक्ती मिळेल आणि दुसरे असे की प्रदूषणाचे प्रमाण कमी होईल या उपाय योजनेने महिला सबलीकरण होईल व त्यांचे आरोग्य जपले जाईल.

"बेटी बचाव ,बेटी पढाव "या कार्यक्रमासाठी शासनाने २८० कोटी रुपये मंजूर केले आहे. हा कार्यक्रम त्यांच्या नावाप्रमाणे जनतेमध्ये जागरूकता निर्माण व्हावी व मुलींसाठी मांडलेले कल्याणकारी सेवांची स्थिती सुधारावी यादृष्टीने शासन प्रयत्न करीत आहे.



Scanned with OKEN Scanner

त्याच बरोबर भारत सरकारने महिला आणि बाल कल्याण मंत्रालय व एच. आर. विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने बेटी बचाव बेटी पढाव हा कार्यक्रम उभारला आहे. त्याच बरोबर सुकन्या समृद्धी योजना ही एक प्रकारची उपाय योजना आहे .अल्प रकमेने मुलीच्या नावाने खाते उघडता येते. मुलीच्या शिक्षण आणि लग्नासाठी होणारा खर्च भागवता यावा यासाठी समृद्धी योजना सुरू करण्यात आली. पंतप्रधानांनी सुद्धा स्त्री सबलीकरणाचे कार्यक्रम सुरू केले स्त्री शिक्षणाद्वारे मुलींना सबळ करण्यामध्ये हे महत्त्वाचे पाऊल आहे.

भारतीय संस्कृतीत स्त्रियांना कुटुंब व समाजात दुय्यम स्थान होते. या काळात स्त्रियांच्या समस्या कडे लक्ष वेधण्यात आले. स्त्रीवाद या नावाने एक नवीन विचार प्रवाह आणि चळवळ पुढे आली.स्त्रीच्या समस्या कोणत्या या गोष्टीकडे अभ्यासकांचे आणि सामाजिक कार्यकर्त्यांची लक्ष गेले स्त्रीला कायद्याने समानता मिळाली. तिच्या दर्जात सुधारणा झाल्याचे दिसते. म्हणूनच नंतर वीस कलमी कार्यक्रमात स्त्रियांना समानता देण्यात आली. स्त्रीला १२ वी पर्यंत शिक्षण माफ करणे स्त्रियांच्या हक्काबद्दल जागरूकता निर्माण करणे सामाजिक व आर्थिक विकासाच्या राष्ट्र उभारणीच्या कामात स्त्रियांना समान संधी देणे. पुढे स्त्रियांना राखीव जागा देण्यात आले. सरकारने महिला विषयक परिणामांमध्ये संपत्तीचा अधिकार इत्यादी प्रकारच्या समान संधी स्त्रियांना उपलब्ध करून दिलेल्या आहेत.

स्वातंत्र्यानंतर भारतीय समाजात स्त्रियांना समान दर्जा देण्याच्या संदर्भात कायद्याच्या दृष्टीने विशेष प्रयत्न झालेत. भारतीय राज्यघटनेने स्त्री पुरुष यांच्यामध्ये कोणताच फरक न करता दोघांनाही समान अधिकार प्रदान केलेत. त्यामुळे स्त्रिया या पुरुषांपेक्षा कनिष्ठ नाहीत. त्यादेखील पुरुषाप्रमाणे कोणत्याही भूमिका योग्य प्रकारे पार पाडू शकतात. फक्त त्यांना संधी मिळाली पाहिजे. स्वातंत्र्य ,समता ,बंधुता आणि न्याय या मानवी मूल्यांचा विचार आहे. शिक्षण आणि नोकरी यामुळे स्त्रियांच्या कौटुंबिक भूमिकांमध्ये परिवर्तन आलेले आहे. त्यामुळे स्त्रियांच्या परंपरागत भूमिकेत बदल झालेला आढळतो. भारताचे माजी राष्ट्रपती डॉ. ए.पी.जे.अब्दुल कलाम यांनी



Scanned with OKEN Scanner

२०२० मध्ये भारताला महासत्ता बनविण्याचे स्वप्न बघितले आहे त्यातून महिला सबलीकरणाचा प्रश्न झालेला आहे.

संदर्भ ग्रंथ

१) स्त्रीवाद संकल्पना व स्वरूप - अर्चना माने

२) स्त्रीवाद - विद्युत भागवत

३) भारतीय स्त्री आणि मानवाधिकार - डॉ.स्मीता मेहेत्रे

४) साहित्य आणि सामाजिक संदर्भ - डॉ. अंजली सोमण

५) भारतीय स्त्री पुरुष - डॉ. अश्विनी धोंगडे

६) योजना - फेब्रुवारी २०१८ व मार्च २०१८

७) महिला सबलीकरण: स्वरूप व समस्या - शुभांगी गोटे

८) भारतीय राज्यघटना - डॉ. -प्रमोद पवार , डॉ. विजय तुंटे



Scanned with OKEN Scanner



– डॉ. संजय पाटील

एकविसाव्या शतकात जागतिकीकरणाच्या परिप्रेक्षात 'सुशासन' व 'व्यवस्थापन' अशा संकल्पना विशेष चर्चेत आल्या. कल्याणकारी राज्यातील शासकीय व्यवस्थेचे 'सुशासन' हे आज आधुनिक रूप आहे. या संदर्भग्रंथातून 'सुशासन' संकल्पनेचा अर्थ, 'सुशासन' निर्मितीची पार्श्वभूमी, सुशासनाची वैशिष्ट्ये, सुशासनासाठी घटनात्मक तरतुदी, सुशासनाच्या मार्गातील अडथळे, सुशासनासमोरील आव्हाने, सुशासनासाठी केलेल्या सुधारणा, व्यवस्थापनाचा अर्थ व उद्दिष्टे, व्यवस्थापनाची कार्ये, POSDCORB संकल्पना, चांगल्या व्यवस्थापनाच्या कसोट्या, व्यवस्थापनाचे महत्त्व, प्रशासकीय नेतृत्वाचा अर्थ, प्रशासकीय नेतृत्वाची वैशिष्ट्ये, प्रशासकीय नेतृत्वाची कार्ये इत्यादी मुद्यांची माहिती व संकल्पनांचा समावेश केलेला आहे. संदर्भग्रंथाची मांडणी साध्या, सोप्या भाषेत व मुद्देसूदपणे करण्यात आली आहे. त्यामुळे प्रस्तुत संदर्भग्रंथ वाचकांना दीपस्तंभ ठरेल, यात कोणतीही शंका नाही.


•••

# सुशासन आणि व्यवस्थापन

Book

(Good Governance and Management)

2021-22



Scanned with OKEN Scanner

अथर्व पब्लिकेशन्स

**सुशासन आणि व्यवस्थापन**
(Good Governance and Management)

© सर्व हक्क सुरक्षित

ISBN : 978-81-953171-2-7
पुस्तक प्रकाशन क्र. ८१५

**प्रकाशक व मुद्रक**
युवराज भटू माळी

**अथर्व पब्लिकेशन्स**
धुळे : १७, देविदास कॉलनी, वरखेडी रोड, धुळे - ४२४ ००१.
**संपर्क :** ९४०५२०६२३०
**जळगाव :** शॉप नं. २, नक्षत्र अपार्टमेंट, शाहूनगर हौसिंग सोसायटी,
तेली समाज मंगल कार्यालयासमोर, जळगाव - ४२५००१.
**संपर्क :** ०२५७-२२३९६६६, ९७६४६९४७९७
**ई-मेल :** atharvapublications@gmail.com
**वेबसाइट :** www.atharvapublications.com

**प्रथमावृत्ती :** १५ ऑगस्ट २०२१
**अक्षरजुळवणी :** अथर्व पब्लिकेशन्स
**मुखपृष्ठ :** विशाल लोहार
**मूल्य :** १५०/-

**E-Book *available on***
**amazon.in ▪ GooglePlayBooks ▪ atharvapublications.com**
ऑनलाइन पुस्तक खरेदीसाठी **www.atharvapublications.com**

या पुस्तकातील कोणत्याही भागाचे पुनर्निर्माण अथवा वापर इलेक्ट्रॉनिक अथवा यांत्रिकी साधनांनी - फोटोकॉपिंग, रेकॉर्डिंग किंवा कोणत्याही प्रकारे माहिती साठवणुकीच्या तंत्रज्ञानातून प्रकाशकाच्या व लेखकाच्या लेखी परवानगीशिवाय करता येणार नाही. सर्व हक्क राखून ठेवले आहेत.



## मनोगत

'सुशासन आणि व्यवस्थापन' हा संदर्भग्रंथ आपल्या हाती देताना मनस्वी आनंद होतो आहे. जळगाव येथील कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठांतर्गत T.Y.B.A. राज्यशास्त्र विषयासाठी CBCS या नवीन अभ्यासक्रमानुसार प्रस्तुत संदर्भग्रंथाची मांडणी केली आहे.

राज्यशास्त्र विषयाची ज्ञानशाखा दिवसेंदिवस विस्तारत आहे. राज्याने कल्याणकारी राज्याचा स्वीकार केल्याने त्यात 'सुशासन आणि व्यवस्थापन' या विषयाला आता विशेष महत्त्व वाढत आहे. एकविसाव्या शतकात जागतिकीकरणाच्या परिप्रेक्षात 'सुशासन' व 'व्यवस्थापन' अशा संकल्पना विशेष चर्चेत आल्या. कल्याणकारी राज्यातील शासकीय व्यवस्थेचे 'सुशासन' हे आज आधुनिक रूप आहे.

या संदर्भग्रंथातून 'सुशासन' संकल्पनेचा अर्थ, 'सुशासन' निर्मितीची पार्श्वभूमी, सुशासनाची वैशिष्ट्ये, सुशासनासाठी घटनात्मक तरतुदी, सुशासनाच्या मार्गातील अडथळे, सुशासनासमोरील आव्हाने, सुशासनासाठी केलेल्या सुधारणा, व्यवस्थापनाचा अर्थ व उद्दिष्टे, व्यवस्थापनाची कार्ये, POSDCORB संकल्पना, चांगल्या व्यवस्थापनाच्या कसोट्या, व्यवस्थापनाचे महत्त्व, प्रशासकीय नेतृत्वाचा अर्थ, प्रशासकीय नेतृत्वाची वैशिष्ट्ये, प्रशासकीय नेतृत्वाची कार्ये इत्यादी मुद्यांची माहिती व संकल्पनांचा समावेश केलेला आहे.

संदर्भग्रंथाची मांडणी साध्या, सोप्या भाषेत व मुद्देसूदपणे करण्यात आली आहे. त्यामुळे प्रस्तुत संदर्भग्रंथ वाचकांना दीपस्तंभ ठरेल, यात कोणतीही शंका नाही. राज्यशास्त्र व लोकप्रशासन या विषयांच्या तद्वतच स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांना या संदर्भग्रंथातील सुशासन, व्यवस्थापन व प्रशासकीय नेतृत्व यांसारख्या घटकांतील अद्ययावत माहितीचा निश्चितच उपयोग होईल. अभ्यासक्रमाचा विचार करता, परिपूर्ण घटकांचा समावेश करण्याचा प्रयत्न केला आहे; परंतु तरीदेखील काही उणिवा व चुका असण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्या लक्षात आणून दिल्यास सुधारणांची दखल घेतली जाईल.

माझ्या इथपर्यंतच्या प्रवासात ज्यांनी अपार कष्ट घेतले, ते माझे



Scanned with OKEN Scanner

Book



**डॉ. संजय काशिनाथ पाटील**
एम. ए., डी.एड., बी.एड., नेट, पीएच.डी. (राज्यशास्त्र)
सहाय्यक प्राध्यापक व राज्यशास्त्र विभाग
पंकज कला व विज्ञान महाविद्यालय, चोपडा, जि. जळगांव.

- कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगाव येथे २०१९ मध्ये डॉ. पी. यू. नेरपगार यांच्या मार्गदर्शनाखाली पीएच.डी. पदवीचे संशोधन कार्य पूर्ण.
- विविध आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय जर्नल्समध्ये ५० पेक्षा अधिक संशोधन पेपर प्रकाशित.
- कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात कुलगुरु संशोधन प्रोत्साहन योजनेअंतर्गत एक लघू संशोधन प्रकल्प पूर्ण.
- कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगांव अंतर्गत राज्यशास्त्र विषयाचे एम. फिल व पीएच.डी. मार्गदर्शक म्हणून मान्यता.
- विविध आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय परिषदांमध्ये सहभाग.
- भारतीय नागरी सेवा, सुशासन आणि व्यवस्थापन हे दोन संदर्भ ग्रंथ प्रकाशित.

**Aadhar Publications**
(National Publishers)
New Hanuman Nagar, Infront of Pathyapustak Mandal, VMV Road, Amravati - 444604.
Email - aadharpublication@gmail.com. M.: 9595560278
ISBN : 978-93-91305-69 7

# आधुनिक भारतीय राजकीय विचार

2021-22



संपादक
**डॉ. संजय पाटील**

Scanned with OKEN Scanner

Relevance of Maulana Azad thoughts in the present Scenario: (2018) Sheikh Faruk Ismile- guided by me
2. Ph.D. thesis प्रा. एस. ए. सत्तार : मौ. आझाद यांचा शिक्षण विचार -प्रकाशित लेख; लोकमत 10 नोव्हेंबर 2014
3. डॉ. शुभांगी राठी: (2015) भारतीय राजकीय विचार अथर्व पब्लिकेशन्स जळगाव
4. शैक्षणिक सुधारणेस बहुव्यापी पर्याय: rohan juvekar | Maharashtra Times | Updated: 9 Nov 2014, 5:31 am





# पंडित नेहरूंचे समाजवादाविषयीचे विचार

डॉ.संजय काशिनाथ पाटील
राज्यशास्त्र विभाग पंकज कला व विज्ञान महाविद्यालय, चोपडा जि. जळगाव

१५ऑगस्ट १९४७ रोजी स्वतंत्र भारताचे पहिले पंतप्रधान म्हणून भारताच्या राज्यकारभाराची धुरा सांभाळण्याचे भाग्य पंडित जवाहरलाल नेहरूंना लाभले. दूरदृष्टी, अभ्यासूवृत्ती, प्रगल्भ निर्णयक्षमता, कल्पकता या सर्व गुणांचा उपयोग त्यांनी भारताच्या राजकारणाला दिशा देण्यासाठी केला. स्वातंत्र्य आंदोलनाच्या काळात त्यांच्या विचारांवर मोतीलाल नेहरू महात्मा गांधी कार्ल मार्क्स यांच्या विचारांचा विशेष प्रभाव पडला होता. त्यातूनच नेहरूंच्या सामाजिक व राजकीय विचारांची जडणघडण झाली. आयुष्याच्या प्रारंभी नेहरू उदारमतवादाचे व व्यक्तिगत स्वातंत्र्य चे कट्टर पुरस्कर्ते होते. प्रचंड वाचन परदेशात शिक्षण घेताना तेथील समाज व्यवस्थेचा केलेला अभ्यास यातून त्यांची विवेकशीलता वृद्धिंगत झाली,

१९४७ ते १९६४ या कालावधीत भारताचे पंतप्रधान असताना त्यांनी राष्ट्र उभारणीचे कार्य केले. स्वातंत्र्य, समता, बंधुता या लोकशाही मूल्यांची जोपासना करण्यासाठी त्यांनी विशेष प्रयत्न केले. परराष्ट्र धोरणात अलिप्ततावाद तत्वाचा स्वीकार करून जागतिक स्तरावर शांतता निर्माण करण्यासाठी प्रयत्न केले.भारतात सामाजिक, आर्थिक, राजकीय क्षेत्रात विकास करण्यासाठी मार्क्स व गांधी विचारांचा त्यांनी आधार घेतला, यातूनच त्यांच्या समाजवादी विचारांची जडणघडण झाली, समाजवादाविषयी जागतिक राजकारणाचा अभ्यास करून स्वतःचे विचार त्यांनी मांडले हे विचार अभ्यास जावेत म्हणून "पंडित नेहरूंचे समाजाविषयीची विचार" हा विषय शोध लेखासाठी निवडला आहे.

**समाजवादाची ऐतिहासिक पार्श्वभूमी**

अठराव्या शतकाच्या उत्तरार्धात इंग्लंडमध्ये औद्योगिक क्रांती झाली. या क्रांतीमुळे गरजेच्या वस्तूचे यंत्राच्या साहाय्याने उत्पादन होऊ लागले. औद्योगिक क्रांतीमुळे नवनवीन यंत्रांचे शोध लावण्यात प्रारंभ झाले. "एकोणिसाव्या शतकाच्या प्रारंभी इंग्लंड, फ्रान्स, जर्मनी या राष्ट्रातून औद्योगिक क्रांतीने जोम धरला. औद्योगिक क्रांतीमुळे मोठ्या प्रमाणावर उद्योगधंदे आणि कारखानदारी यांचा झपाट्याने विकास झाला. यातूनच भांडवलशाही स्वरूपाचे अर्थव्यवस्था निर्माण झाली."[१]

भांडवलशाही अर्थव्यवस्थेत भांडवलदार व कामगार असे दोन गट निर्माण झाले. उत्पादन साधनांची मालकी भांडवलदारांकडे होती. यातून कामगारांचे



Scanned with OKEN Scanner

...षण होऊ लागले. समाजात शोषक- शोषित, आहे रे - नाही रे अशी विषमता निर्माण झाली. ही विषमता नष्ट करण्यासाठी व उत्पन्नाचे समान वाटप व्हावे या उद्देशाने समाजवादाची संकल्पना संपूर्ण युरोपात व जगात रूढ झाली. समाजवादाची संकल्पना प्राचीन काळापासून अस्तित्वात असलेली दिसते.

इसवी सन पूर्व ४२७ ते ३४७ मध्ये प्लेटोने आपल्या ग्रंथात संपत्तीचा साम्यवाद मांडलेला दिसून येतो. यातच समाजवादाची बीजे सापडतात. इ.स. १९४१ मध्ये 'रॉबर्ट ओवेन' ने 'समाजवाद' या शब्दाचा वापर करून त्यास मूर्त रूप दिले. "इ. स.१७६० ते १८२५ या काळात ख्रिश्चन धर्मगुरु सेंट सायमन यांनी सर्वप्रथम समाजवादी विचारसरणीचा अन्वयार्थ लावला. म्हणून त्यांना समाजवादाची जनक म्हटले जाते."[२] भांडवलशाही अर्थव्यवस्थेचे पुनर वाटप केल्याशिवाय समाजाचे शोषण थांबणार नाही, असा विचार त्यांनी मांडला. तदनंतर चार्लस् फेरियर, सिस्मांडो यांनी देखील समाजाविषयी विचार मांडले.

**समाजवादाचा अर्थ व व्याख्या-**

ब्रिटनमधील समाजवादाचा संस्थापक रॉबर्ट ओवेन यांनी 'Socialism' हा समाजवादाचा इंग्रजी शब्द प्रयोग सर्वप्रथम प्रचारात आणला. यात मूळ शब्द 'Socious' म्हणजे समाज या अर्थाचा आहे. यावरून समाजाशी संबंधित विचारप्रवाह म्हणजे समाजवाद होय.

विविध विचारवंतांनी समाजवादाची व्याख्या केलेली आहे

लेनिनच्या मते, "समाजवाद म्हणजे मजूर वर्ग अधिक तत्वज्ञान. समाजवादाचा मुख्य हेतू हा उत्पन्नाचे समसमान वितरण करून सर्वांना संपत्तीचा न्याय्य वाटा मिळवून देणे आहे. समाजवादाचे ध्येय सर्वांसाठी पूर्ण रोजगार आणि सामाजिक न्यायाची प्राप्ती हे आहे."[3]

ह्युगमच्या मते, "समाजवाद ही श्रमिक वर्गाची राजकीय चळवळ आहे कामगारांचे शोषण समाप्त करणे हा त्याचा उद्देश आहे".[४]

जोसेफ शॅम्प्युटरच्या मते, "समाजवाद ही एक आर्थिक व्यवस्था आहे की, ज्यात मध्यवर्ती सत्तेकडे उत्पन्नाच्या साधनांचे नियंत्रण असते. ज्यात समाजाच्या आर्थिक व्यवहारावर खाजगी कार्यक्षेत्राची मालकी नसते तर सार्वजनिक मालकीची असते."[५]

एन्सायक्लोपीडिया ब्रिटानिकानुसार, "समाजवाद ही एक सामाजिक संघटनेची व्यवस्था आहे की, ज्यात खाजगी मालमत्ता आणि उत्पन्नाचे वितरण हे व्यक्तीकडून स्वतःच्या हितसंबंधांना पाठलाग न करता अथवा भांडवलदारांच्या बाजार शक्तीकडून निश्चित होण्याऐवजी सामाजिक नियंत्रणानुसार होते."[६]





वरील सर्व व्याख्यांच्या अभ्यासावरून असे लक्षात येते की, समाजातील विषमता नष्ट करण्यासाठी, श्रमिकांची पिळवणूक थांबवण्यासाठी, समाजात समानता प्रस्थापित करण्यासाठी, समाजवादाची निर्मिती झाली. समाजवादात सर्वांना समान संधी, उत्पादन साधनांवर समाजाचा समान मालकी हक्क, उत्पादन साधनांचे समान वाटप याबाबत एकवाक्यता दिसून येते.

**भारतातील समाजवादी विचारधारा व नेहरू**

१९१७ च्या रशियातील राज्यक्रांतीनंतर भारतात समाजवादी विचारांची पेरणी व्हायला सुरुवात झाली. या काळात कार्ल मार्क्सच्या विचारांवर कार्य करणारा 'कम्युनिस्ट' हा समाजवादी विचारसरणीचा पक्ष होता. "भारतातील 'कम्युनिझम' चे मूळ प्रेरक मानवेंद्रनाथ रॉय असले, तरी कम्युनिस्ट पक्ष स्थापनेचे श्रेय कॉम्रेड श्रीपाद डांगे, पी.सी. जोशी यांना जाते."[७] १९२० ते १९३० या काळात पाश्चात्त्य राष्ट्रांत शिक्षण घेतलेले जयप्रकाश नारायण, जवाहरलाल नेहरू, एस. एम. जोशी, राम मनोहर लोहिया यांच्यावर समाजवादी विचारांचा परिणाम झाला. सन १९२९ मध्ये लाहोरच्या काँग्रेस अध्यक्षपदावरून बोलताना पंडित नेहरु म्हणतात, "दारिद्र्य आणि त्यातून निर्माण होणारे दोष ही एक जागतिक परिस्थिती आहे. दारिद्र्य आणि विषमता यांची पाळेमुळे भारतीय जीवनात खोलवर गेली आहेत. तेव्हा त्यांचे निर्मूलन समाजवादाचा स्वीकाराशिवाय होणार नाही."[८] नेहरूंवर कार्ल मार्क्सच्या तत्त्वज्ञानाचा प्रभाव होता मात्र यातील क्रांतीची कल्पना नेहरुंना मान्य नव्हती. इंग्लंडमध्ये असताना तेथील उदारमतवाद, व्यक्तिस्वातंत्र्य, संसदीय शासनप्रणाली, वैज्ञानिकता,औद्योगिक तंत्रज्ञान या बाबींचा प्रभाव नेहरूंवर पडला होता.१९३० ते १९३६ या कालखंडात नेहरूंचा समाजवादी विचार हा साम्यवादाकडे वळला होता. या कालखंडात भारतातील शेतकरी व कामगारांच्या समस्या अधिक प्रखर बनल्या होत्या, पुढे नेहरूंनी गांधीजींच्या अहिंसात्मक मार्गाचा अवलंब करून समाजवादी पद्धतीचा स्वीकार केला. यासंदर्भात पंडित नेहरू म्हणतात,"महात्मा गांधीनी आग्रह धरलेली सर्वाधिक महत्त्वाची बाब म्हणजे साधनांचे महत्त्व ही होती. साधनांद्वारे साध्याना आकार देता येतो. हेच आम्ही त्यांच्याकडून शिकलो आणि त्यांचा चांगल्या प्रकारे उपयोग सुद्धा केला."[९] कम्युनिझममुळे व्यक्तिस्वातंत्र्याला मर्यादा येत असल्याने त्यांनी व्यक्तीस्वातंत्र्य निर्माण करणारा समाजवादाचा स्वीकार केला. यातूनच त्यांनी लोकशाही समाजवाद मांडला.

**नेहरूंचा लोकशाही समाजवाद-**

विसाव्या शतकात लोकशाही समाजवादाची विचारधारा निर्माण झाली. आर्थिक विषमता कमी करण्यासाठी उद्योगधंद्यांचे राष्ट्रीयीकरण करून लोकशाही मार्गाने समाजवाद आणता येईल हे त्यांचे मुख्य सूत्र होते. राजकीय लोकशाही आणि



Scanned with OKEN Scanner

व्यक्ती स्वातंत्र्य या मानवी मूल्यांच्या चौकटीत सामाजिक न्याय व समता ही तत्त्वे बसवून लोककल्याणाच्या दृष्टीने राज्यव्यवस्था चालली पाहिजे हा लोकशाही समाजवादाचा प्रमुख उद्देश होता.

समाजातील प्रश्न सोडविण्यास भांडवलशाही व्यवस्था अयशस्वी ठरली होती. भारतातील सामाजिक, आर्थिक बदलांसाठी समाजवाद ही अपरिहार्य व्यवस्था आहे. समाजातील विषमता व दारिद्र्य दूर करण्यासाठी समाजवादाशिवाय पर्याय नाही याची जाणीव नेहरूंना होती. याविषयी ते म्हणतात, "माझी अशी खात्री झाली आहे की, जगाच्या आणि भारताच्या समस्यांची सोडवणूक करण्याची किल्ली केवळ समाजवादातच आहे. समाजवादाशिवाय मला दारिद्र्य, बेकारी, अधःपतन आणि भारतीय लोकांचे पारतंत्र्य संपवण्याचा मार्ग दिसत नाही."[१०] यावरुन दारिद्र्याचा उगम जेव्हा वर्गीय शोषणातून होतो तेव्हा तो अधिक जाचक होतो. या शोषणपद्धती बंद करण्यासाठी समाजवादाचा मार्गच अधिक सुलभ असल्याचे नेहरूंना मान्य होते.

लोकशाहीच्या मार्गाने शांततामय व सनदशीर मार्गाने समाजवाद आणला जाऊ शकतो, यावर नेहरूंचा विश्वास होता. समाजात स्वातंत्र्य, समता, बंधुता, न्याय यासारख्या लोकशाही मूल्यांची रुजवणूक करण्यासाठी लोकशाही व समाजवाद या तत्त्वांची जोपासना होणे गरजेचे होते, समताशिवाय स्वातंत्र्य व लोकशाही निर्माण होऊ शकत नाही आणि उत्पन्नाच्या खाजगी कचाट्यातून सुटल्याशिवाय समता प्रस्थापित होऊ शकत नाही, यासाठी समाजवाद लोकशाहीला पूरक ठरतो. असे नेहरूंना वाटत होते. नेहरूंचा समाजवाद हा व्यक्तिस्वातंत्र्याला मारक नव्हता. आर्थिक व राजकीय सत्तेचे केंद्रीकरण टाळण्यासाठी नेहरूंनी लोकशाही समाजवादाचा स्वीकार केला. यातून व्यक्तीचा सर्वांगीण विकास व्हावा, सामाजिक, आर्थिक, राजकीय क्षेत्रात समानतेची वागणूक मिळावी अशी नेहरूंची भूमिका होती.

**लोकशाही समाजवादासाठी नेहरुंनी केलेले प्रयत्न-**

भारताचे पहिले पंतप्रधान म्हणून भारताला लोकशाही समाजवादाच्या मार्गाने घेऊन जाण्याचे मोठे प्रयत्न नेहरूजींनी केले.

**➢ मिश्र अर्थव्यवस्था**

समान आर्थिक न्याय व संपत्तीचे न्याय वितरण यासाठी त्यांनी मिश्र अर्थव्यवस्थेचा स्वीकार केला. "सामाजिक व आर्थिक परिवर्तन घडवून आणण्यासाठी सार्वजनिक उद्योगाबरोबरच खाजगी उद्योगांनाही चालना दिली पाहिजे मात्र खाजगी उद्योगांवर सरकारचे पूर्णपणे बंद राहील, या तत्वाला मिश्र अर्थव्यवस्थेत नेहरूनी प्राधान्य दिले."[११] भांडवलशाही कमी करण्यासाठी मालक व मजूर यांचे संबंधात सुधारणा करण्यासाठी नेहरूंनी प्रयत्न केले. यासाठी मजुरांनाही उत्पादन





साधनात त्यांच्या प्रक्रियात भागीदार म्हणून समाविष्ट करून घ्यावे यावर नेहरूंनी भर दिला.

**➢ नियोजन**

रशियाप्रमाणे भारतात समाजवादी कार्यक्रम नियोजनाद्वारे आणावा असा नेहरूंचा मानस होता. राष्ट्राचे सर्वांगीण प्रगतीचा मुख्य आधार आर्थिक प्रगती आहे. यासाठी आर्थिक क्षेत्रात नियोजन व औद्योगिकरण याचा स्वीकार नेहरुंनी केला.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर १९५० मध्ये पहिले नियोजन मंडळ जवाहरलाल नेहरूंच्या अध्यक्षतेखाली स्थापन केले केले. यातूनच भारताच्या पंचवार्षिक योजनाची सुरुवात झाली. आधुनिक वैज्ञानिक शास्त्र ,तंत्रज्ञान, औद्योगिक क्षेत्र,मोठे, मध्यम व लघु उद्योगधंदे यांना पंचवार्षिक योजनेतून चालना मिळाली. पंचवार्षिक योजनांमध्ये कृषी, शिक्षण, आरोग्य, उद्योग यासारख्या विविधांगी विषयाच्या तंत्रज्ञानात प्राधान्य दिले. "सामाजिक व आर्थिक न्याय, पूर्ण रोजगार, सार्वजनिक मालकी, भौतिक साधनांचे नियमन आणि खाजगी लोकांच्या हातात आर्थिक संपत्ती व सत्तेचे केंद्रीकरण टाळण्याचा प्रयत्न यांना राष्ट्रीय नियोजनाच्या उद्दिष्टात स्थान दिले."[१२] १९५२ ते १९६४ या नेहरूंच्या कालखंडात तीन पंचवार्षिक योजनांचा समावेश होता. या काळात त्यांनी भारताच्या सर्वांगीण क्षेत्रात विकास व्हावा यासाठी अनेक विविध उपक्रम हाती घेतले. या सर्व पंचवार्षिक योजनांमधून लोकशाही समाजवादी समाजरचना निर्माण करण्याचे ध्येय व उद्दिष्ट डोळयासमोर ठेवून त्यानुसार उपक्रम हाती घेतले.

**➢ जमीन सुधारणा**

भारताच्या आर्थिक विकासात श्रमिकांना बरोबरच शेतीचा ही विकास महत्त्वाचा आहे. भारतीय शेतीच्या समस्येविषयी नेहरूंना चांगली जाण होती. जमिनीच्या मालकी हक्कांच्या रचनेत बदल करून, अन्नधान्य खरेदीची व वितरणाची परिणामकारक व्यवस्था उभारून, परंपरागत व्यवस्था मोडून काढणे हे जमीन सुधारण्याचे मुख्य ध्येय होते. याविषयी नेहरु म्हणतात, "शेतीच्या प्रगतीसाठी योग्य जमीन विषयक धोरण आवश्यक आहे. अनेक राज्यातून जमीनदारी व जहागीरदारी पद्धत संपुष्टात आणून हे साध्य करण्याचा प्रयत्न आम्ही केला आहे. सर्व मध्यस्थांचे निर्मूलन करणे हे कार्य आम्हाला पूर्ण करावयाचे आहे."[१३]यातूनच पुढे जमीन सुधारणा कायद्याच्या माध्यमातून जमीनदार व मध्यस्थांची उच्चाटन करण्यात आले. कुळांना संरक्षण देण्यात आले.कमाल जमीन धारणाला मर्यादानिश्चित करण्यात आली. हे समाजवादी समाजनिर्मितीचे महत्त्वाचं पाऊल होते.



Scanned with OKEN Scanner

...कर्ष-

१. नेहरूंना कार्ल मार्क्सच्या तत्वज्ञानाचे आकर्षण वाटत होते. मार्क्सने मानवतावादी दृष्टिकोनातून शास्त्रीय समाजवाद मांडला होता मात्र त्यातील क्रांतीची कल्पना नेहरूंना पसंत नव्हती.

२. भारतात समाजवाद रुजवायचा असेल तर त्यासाठी भारतीयांच्या समस्या समजून घेणे याचे स्पष्टीकरण भारतीय भाषेत करणे आवश्यक आहे याची जाणीव नेहरूंना होती.

३. भारतात समाजवादी समाजरचना निर्माण करण्यासाठी लोकशाही शांततामय मार्ग योग्य आहे याशिवाय व्यक्तीचा सर्वांगीण विकास होणार नाही याची नेहरूंना शाश्वती होती.

४. स्वातंत्र्योत्तर काळात पंचवार्षिक योजनांच्या माध्यमातून मिश्र अर्थव्यवस्थेचा स्वीकार करून औद्योगिकीकरणास प्राधान्य देऊन शिक्षण व उच्च तंत्रज्ञान यासारख्या घटकांना वळ देऊन नेहरूंनी भारतात लोकशाही समाजवादाचा पाया घातला.

५. भारतीय समाजात न्याय, स्वातंत्र्य, समता, बंधुता, लोकशाही मूल्ये रुजविण्यासाठी समाजवादाचा मार्ग नेहरु निवडला होता, त्यातूनच लोक कल्याणकारी राज्याची निर्मिती झाली.

**संदर्भग्रंथ -**


१. दाभोळकर, देवदत्त. : समाजवादाचा आशय- समाजवाद प्रेरणा व प्रक्रिया, जोशी आणि लोखंडे प्रकाशन, पुणे .पृष्ठ क्र. ६

२. दुलंगेकर, ना.रा.: भारतीय लोकशाही आणि समाजवादी वाटचाल, पृष्ठ क्र.८७

३. मेहता, अशोक :स्टडी इन एशियन सोशालिझम, पृ. ९९

४.देवरे, डॉ. पी.डी.: आधुनिक राजकीय विचारप्रणाली, प्रशांत पब्लिकेशन्स, जळगाव. पृ क्र. ६२

५.कदम, डॉ.संजीवन माणिकराव: नेहरूंचा समाजवाद आणि आजचे राजकारण, कैलास पब्लिकेशन्स, औरंगाबाद. पृष्ठ क्र. २१

६.उपरोक्त क्रमांक ५, पृष्ठ क्र २३

७.उपरोक्त क्रमांक २, पृष्ठ क्र १३३

८.पाटील,बी.बी.:भारतीय राजकीय विचार फडके प्रकाशन,कोल्हापूर.पृष्ठ क्रमांक २२

९.करंज आर. के.,: द माइंड ऑफ मिस्टर नेहरू, पृष्ठ क्रमांक २२५

१०. नेहरू, जे .:इंडिया फ्रीडम -सिलेक्टीव्ह एसेज लेटर स्पीचेस प्रेसिडेन्शिअल ॲड्रेस टू द काँग्रेस,१९६२ पृष्ठ क्रमांक ३५

११. उपरोक्त क्रं.८, पृष्ठ क्रमांक २३

१२. उपरोक्त क्रं.५, पृष्ठ क्रमांक १००

१३.उपरोक्त क्रं.५, पृष्ठ क्रमांक २४






# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारातील भारतीय राज्यघटनेतील महिलांचे स्थान


**डॉ. राजेंद्र सुभाष नाडेकर**

राज्यशास्त्र विभाग प्रमुख, भुसावळ कला, विज्ञान आणि पी. ओ. नाहाटा वाणिज्य महाविद्यालय, भुसावळ. जिल्हा – जळगाव,मोबाईल न. ९९७००८६३१६


**प्रस्तावना:-**

भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी मसुदा समितीचे अध्यक्ष या नात्याने घटना निर्मितीच्या कार्यात संपूर्ण योगदान दिले. त्याचा परिणाम अत्यंत अभ्यासपूर्ण आणि सर्वसमावेशक भारतीय राज्यघटनेची निर्मिती करण्यात आली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या 'स्टेट्स अंड मायनॉरिटी' या ग्रंथामधून ते घटनावादाचा अर्थ स्पष्ट करतात."घटनावाद म्हणजे सत्तेचा वापर कसा, कोणत्या मर्यादेत आणि कशासाठी करावा याबाबतची नियमावली म्हणजे घटनावाद होय." राज्यघटनेची निर्मिती करत असताना महिलांचे स्थान समानतेवर आधारित निर्माण करण्यात आले.त्यांनी आपल्या विविध ग्रंथांमधून स्त्री- पुरुष समानता, स्वातंत्र्य, समता, बंधुता व न्याय या लोकशाही मूल्यांची रुजवण होण्यासाठी विविध उपाययोजना सुचविल्या. त्याच पद्धतीने लोकशाही अस्तित्वात येण्यासाठी राज्यघटनेद्वारे स्त्री-पुरुष समानतेचा व समान अधिकारांचा समावेश होणे गरजेचे असल्याचे म्हटले. त्यासाठी त्यांनी हिंदू संस्कृतीच्या प्राचीन वैदिक गौरवशाली मूल्यांचा विचार केला. त्यात असलेला समताभाव, स्त्रियांचे प्रतिष्ठेचे स्थान यावर प्रकाश टाकला. गौतम बुद्ध हे देखील तीन प्रमुख कुप्रथांचा विरोध करत असल्याचे म्हटले आहे. त्यात त्यांनी 1.वेदांच्या अधिकार श्रेष्ठतेला नकार दिला. 2. धर्म म्हणून बळी प्रथेला विरोध. 3. जाती प्रथेला वर्णव्यवस्थेला प्रखर विरोध यातून शोषणाच्या आणि अन्यायी व्यवस्थेला त्यांनी विरोध केला असल्याचे म्हटले आहे.[1] तसेच शांतता, सत्य, अहिंसा या लोकशाही मूल्यांचा देखील त्यांच्या विचारातून स्पर्श होतो. तसेच वैदिक काळ ते कौटिल्य काळापर्यंत महिलांचे स्थान स्त्री - पुरुष समानतेचे, प्रतिष्ठेचे व न्यायाचे राहिले दिसते. मात्र मनुस्मृतीच्या काळानंतर महिलांच्या स्थानाबाबत दुय्यमत्व वाढत गेलेले दिसते. त्यामुळे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्या 'क्रांती आणि प्रतिक्रांती' या पुस्तकांमधून महिलांचे प्राचीन गौरवशाली स्थान स्पष्ट केलेले दिसते. थोडक्यात महिलांच्या स्त्री-पुरुष समानतेचा व न्यायाचा स्वातंत्र्यावर आधारित समतावादी दृष्टिकोन प्रस्थापित करण्यासाठी राज्यघटनेची निर्मिती करण्यात आली. राज्यघटनेची निर्मितीकरून महिलांना पुन्हा



Scanned with OKEN Scanner